प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. 05.08.2021

# सिडकोकडून 281.77 हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागाला हस्तांतरण

पर्यावरणाच्या दृष्टीने असलेले कांदळवनांचे महत्त्व लक्षात घेता, कांदळवनांचे "राखीव वने" म्हणून संरक्षण आणि संवर्धन व्हावे या उद्देशाने सिडको महामंडळाकडून आपल्या अधिकारक्षेत्रातील, रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील कामोठे येथील 134.30 हेक्टर, पनवेल येथील 38.46 हेक्टर व कोल्हे-खार येथील 109 हेक्टर, अशा एकूण 281.77 हेक्टर कांदळवन क्षेत्राचे 05 ऑगस्ट 2021 रोजी वन विभागाच्या कांदळवन कक्षाला हस्तांरण करण्यात आले.

**"किनारी भागांकरिता संरक्षक म्हणून कांदळवनांचे महत्त्व असल्याने, कांदळवनांचे राखीव वने म्हणून संरक्षण व्हावे याकरिता सिडकोने आपल्या अधिकारक्षेत्रातील कांदळवन क्षेत्राचे वन विभागाकडे हस्तांतरण केले आहे. नवी मुंबई क्षेत्रात येणारे महत्वाकांक्षी प्रकल्प लक्षात घेता सिडकोचा हा निर्णय नवी मुंबईच्या पर्यावरण रक्षणासाठी व वाढीसाठी फायदेशीर ठरणार आहे.**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

श्रीमती निनू सोमराज, उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई विभाग, श्री. डी. एस. कुकडे, वनक्षेत्रपाल, नवी मुंबई तसेच श्री. सतिशकुमार खडके, अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको यांनी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली सदर हस्तांरण प्रक्रिया पार पाडली. श्री. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको व इतर अधिकारी हे देखील या प्रसंगी उपस्थित होते.

जमिनीची धूप होण्यापासून वाचवण्यासह पुराचे पाणी व वादळाला अटकाव करण्यामध्ये कांदळवने महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच अनेक पशू-पक्षी व जलचरांचा कांदळवनांमध्ये अधिवास असतो. हे लक्षात घेऊन

कांदळवनांना पुरेसे वैधानिक संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून कांदळवन क्षेत्र अधिसूचित करून, सिडकोकडून उपरोक्त कांदळवन क्षेत्राचा ताबा कांदळवन कक्षाला देण्यात आला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**